॥ श्री ॥

॥ बाबा ॥

जय जय ढुंढीराजा शंभु गौरीतनया
आरती ओवाळीते असे,भोळा भाव माझा ॥धृ॥

पौष व द्वितीयेता,वांगणी मंदिरी आला
बाबांनी कौतुकाने नामकरण विधी केला
धोंड़ीबा,नावाने बाळ प्रसिध्द झाला
बाबांचा तिळगुळ सेवूनी,मनोमनी हर्षला ॥1॥

वेगे वेगे धाऊनी भक्ताघरी प्रगटला
गणेश चतुर्थीला आसनावरी विराजला
काया वाचा सुमनाने मनोभावे पुजियेला ॥2॥

एकवीस पाकळ्यांनी श्रध्दा पुत्रवती झाली
प्रत्यक्ष आगमनाने भक्ता साक्ष हो दिली
सुमनांच्या झुल्यामध्ये बाळ येटीत बैसले
वात्सल्याचे मोदक सेवूनी ढेकर तृप्तीचे दिले ॥3॥

बाबांच्या आशिर्वादाने भक्तांत चैतन्य फुलले
सुज्ञ अज्ञ अंतरह्रदयी बाबा स्फुरण पावले
आरती स्वाने अंर्तभाव प्रगट झाले ॥4॥

धुंड़ीबाबा तुझे चरणी आहे एक विनवणी
अज्ञान सारी बालके स्मरण राहो सतत ह्रदयी
अखंड अनुसंधान राहो बाबा मंदिरी
कृपा दृष्टी सदा राहो सा-या भक्तगणावरी ॥5॥

★★★★★